# ॥ रामदास ॥



श. श्री. पुराणिक

श्रीमती रमाबाई पुराणिक

यांस

श्री पुराणिक

२७-८-६६

# रामदास
## (व्यक्तिदर्शन)

प्रा. श. श्री. पुराणिक

चंद्रकला प्रकाशन

- चंद्रकला प्रकाशन क्र. – १००

- **प्रकाशक**
  सौ. शशिकला उपाध्ये
  चंद्रकला प्रकाशन,
  १३८, कसबापेठ,
  पुणे -४११ ०११



- © श. श्री. पुराणिक
  ३६, न्यू आनंदनगर,
  तळेगाव दाभाडे
  ४१० ५०६



- **मुखपृष्ठ**
  चंद्रमोहन कुलकर्णी

- **मुखपृष्ठ व आतील छपाई**
  जंगम कलामुद्रण, पुणे

- **अक्षरजुळणी**
  पॅम इंटरनॅशनल
  सौ. पद्मिनी रुईकर
  १३९५, कसबा पेठ,
  पुणे ४११ ०११

- **प्रथमावृत्ती**
  मार्च १९९६

- **मूल्य** रु. २८०/-

माझे सासरे
ती. त्र्यंबक महादेव गद्रे
व सासूबाई
कै. ती. सौ. निर्मलाबाई गद्रे
यांचे चरणी.

# उपेक्षित आणि वादग्रस्त

ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, नामदेव या मराठी संतांच्या प्रभावळीतला - त्यांच्या इतकाच प्रसिद्ध परंतु त्यांच्याइतका मुळीच लोकप्रिय नसलेला किंबहुना वादग्रस्त असलेला संत रामदासांशिवाय दुसरा कोणी असेल असे वाटत नाही. श्री. म. माटे यांनी त्यांना 'दुर्दैवी' म्हटलेले आहे, कारण त्यांच्या प्रवृत्तिधर्माचा उपदेश करणारा एकही शिष्य त्यांना लाभलेला नाही. परंतु हा दैवाचा विपरीत लीलेचा भाग जरी सोडला तरी, रामदासांवर अनेकजण अनेक कारणांमुळे नाराज आहेत. कोणा वारकरी सांप्रदायिकांना ते आपले वाटत नाहीत. रामदासांनी चातुर्वर्ण्याचा व ब्राह्मणी वर्चस्वाचा पुरस्कार केला म्हणून कोणी त्यांच्यावर राग धरून आहेत. कोणाच्या मताने रामदासांचा 'दासबोध' हा ब्राह्मणाने ब्राह्मणांचा आचारधर्म सांगणारा, ब्राह्मणांसाठी लिहिलेला ग्रंथ आहे. त्यात तळागाळातल्या माणसांना घेण्यासारखे काही नाही. कोणी विचारवंत रामदासांनी राजकारण केले व शिवछत्रपतींनी त्यांना आपले गुरुपद अर्पण केले यामुळे कष्टी आहेत. त्यांनी रामदासांच्या 'राजकारणा'चा अर्थ 'चातुर्य' असा केला आहे व छत्रपतींची व त्यांची भेट फार उशीरा म्हणजे इ.स. १६७२ मध्ये छत्रपतींचे जीवितकार्य जवळ जवळपूर्ण होत आले असताना झाली असल्यामुळे व राजकारणात रामदासांनी त्यांना मार्गदर्शन करण्यासारखे नसल्यामुळे - रामदास असलेच तर छत्रपतींचे केवळ पारमार्थिक गुरू होते असा सिद्धान्त मांडला आहे. कोणी स्त्रीमुक्तिवादी रामदासांनी त्यांच्या वाग्दत्त वधूला ऐन बोहल्यावर धाका दिला म्हणून त्यांच्यावर राग धरून आहेत. एका चतुर स्त्रीने तर 'जैसे बोलणे बोलावे। तैसेचि चालणे चालावे।' असा उपदेश करणाऱ्या रामदासांनी प्रपंचाचा उपदेश केला परंतु प्रपंचातून मात्र पळ कसा काढला असा बिनतोड प्रश्न टाकला आहे. या सर्व उलट सुलट प्रवृत्तींची परिणतीही असेल कदाचित् परंतु रामदास हे उपेक्षित आणि वादग्रस्त संत राहिलेले आहेत. याचे साधे गमक असे की इ.स. १९८३ साली रामदासांच्या समाधीची त्रिशताब्दी आली आणि गेली पण तिची दखलही फारशी कोणी घेतली नाही. शासनाने नाही आणि सामान्य जनांनीही नाही.

रामदासांवरच्या उलट सुलट आक्षेपांचे निरसन करण्याचा माझा उद्देश नाही. तेवढी माझी बौद्धिक ऐपतही नाही. माझा उद्देश अगदी साधा आहे. शंखापासून विविध ध्वनी निघतात, त्या ध्वनींचा पाठलाग करण्यापेक्षा ज्यातून हे ध्वनी निघतात, तो शंखच हस्तगत करावा; या 'उपनिषदा'तल्या दृष्टान्ताप्रमाणे ज्यांच्या जीवनामुळे व कार्यामुळे आज तीनशे वर्षांनंतरही एवढी वादप्रतिवादांची रणधुमाळी माजलेली आहे, त्या रामदासांचेच बहुरंगी, गुंतागुंतीचे आणि पराकाष्ठेचे व्यामिश्र व्यक्तिमत्त्व होतेतरी कसे, याचा शोध घ्यावा हा रामदासांवरच्या प्रस्तुत ग्रंथाचा उद्देश आहे. तोच त्याचा प्रपंच आहे व त्याचा परमार्थही तोच आहे.

# पूर्वसूरींचे ऋण

समर्थ रामदासांचे मंडन असो, खंडन असो, त्यांच्या साहित्याचे मूल्यमापन असो, की त्यांच्या व्यक्तिमत्वाचा अभ्यास असो, समर्थांच्या साहित्याप्रमाणेच त्यांच्यावरच्या साहित्याचाही परामर्श घेणे अनिवार्य ठरते. या दृष्टीने विचार करू लागले, म्हणजे दासबोध, स्फुट प्रकरणे, रामायणे, अभंगशतके प्रसविणाऱ्या रामदासांप्रमाणेच त्यांच्याबद्दलचे साहित्यही अ वाढव्यसेतु आहे, हे लक्षात येते. ते म्हणजे दुसरे एक 'समर्थग्रंथ भांडार'च आहे. कितीही वादग्रस्त असले, तरी समर्थांच्या व्यक्तिमत्वाने, कार्याने व वाङ्मयाने शत्रु-मित्रांना आज अनेक दशके विलक्षण मोहिनी घातलेली आहे, हे नाकारण्यात अर्थ नाही.

राजवाडे यांच्या 'रामदास' या निबंधाने रामदासांच्या अभ्यासाला या शतकाच्या सुरुवातीला आरंभ झाला आणि संस्कृत व्याकरणामध्ये पाणिनी, कात्यायन आणि पतंजली हे जसे 'मुनित्रय' समजले जाते, त्याप्रमाणे समर्थांच्या अभ्यासकांत राजवाडे, देव आणि पांगारकर हे 'मुनित्रय' समजणे योग्य आहे. राजवाडे यांनी रामदासांवर स्वतंत्र ग्रंथ लिहिलेला नसला तरी 'रामदास' या त्यांच्या निबंधाने दिव्याने दिवा लागावा त्याप्रमाणे धुळ्याचे समर्थभक्त शंकर श्रीकृष्ण देव यांच्या प्रमाणे अनेकांना समर्थांच्या अभ्यासाची स्फूर्ती दिली. 'रामदास', 'महाराष्ट्रातील शिवकालीन समाजरचना', 'श्री समर्थ संप्रदायाचे उद्देश, स्वरूप व कार्य' या त्यांच्या निबंधांत व 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' खंड १, ४ व ६, 'राधामाधवविलासचंपू' या ग्रंथांच्या प्रस्तावनेत त्यांनी रामदासांचे ऐतिहासिक कार्य, रामदासी संप्रदाय व वारकरी संप्रदाय, रामदास - शिवाजी संबंध, महाराष्ट्रधर्म यांची सूक्ष्म चिकित्सा केलेली आहे. राजवाडे यांची ही मीमांसा हेगेल व काण्ट यांच्या ऐतिहासिक तत्त्वज्ञानाने सम्यक् संस्कारित झालेली आहे.

राजवाडे यांच्या नंतर १९०४ पासून १९५८ पर्यंत शंकरराव देव यांनी समर्थ सेवेला सर्वस्व वाहिले. त्यांचे 'श्रीसमर्थावतार' 'श्रीसमर्थ हृदय' व 'श्रीसमर्थ संप्रदाय' हे तीन ग्रंथ म्हणजे त्यांच्या समर्थभक्तीचे जिवंत स्मारकच समजण्यास हरकत नाही. पांगारकर यांनी 'श्रीसमर्थ ग्रंथ भांडार' व 'दासबोध' या ग्रंथांना लिहिलेल्या प्रस्तावनांप्रमाणेच, 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' या त्यांच्या त्रिखंडात्मक ग्रंथमालेतील 'रामदास खंड' सर्वस्वी रामदासांच्याच अभ्यासाला वाहिलेला आहे. वि. ल. भावे यांच्या 'महाराष्ट्र सारस्वत' या ग्रंथांतील 'रामदास' या प्रकरणात रामदासांच्या प्रवृत्तिधर्माचे रसाळ विवेचन केले आहे. आळतेकर यांचे समर्थचरित्र म्हणजे या सर्व अभ्यासकांच्या विचारांचा 'सारांशकोश' च म्हणता येईल. श्रीपाद महादेव माटे यांची ही गणना रामदासांच्या अत्यंत श्रेष्ठ अभ्यासकांतच करावी लागेल. 'पारमार्थिकांनी केलेला रामदासांचा पराभव', 'माझ्या राजश्रा' या त्यांच्या निबंधांत व 'संत, पंत व तंत' आणि 'श्रीरामदास स्वामींचे प्रपंचविज्ञान' या प्रबंधात त्यांनी वारकरी संतांप्रमाणे रामदासांच्याही कार्याची मूलगामी चिकित्सा त्यांच्या नेहमीच्या रसिक मर्मज्ञतेने केलेली आहे; व रामदासांवरच्या आक्षेपांचा परिहार करण्याचा प्रयत्न केला

आहे. न. र. फाटक, बा. र. सुंठणकर व गं. बा. सरदार यांनी समर्थांच्या कार्याची अगदी वेगळ्या प्रकारे चिकित्सा केली आहे, आणि त्यांतही सुंठणकर व सरदार यांच्या मीमांसेवर मार्क्सवादाची छाया आहे. तिला उत्तर देण्यचा प्रयत्न पु. ग. सहस्रबुद्धे यांनी 'माझे चिंतन' या ग्रंथातील, 'संतांच्या कार्याचे नवे मूल्यमापन' व 'प्रवृत्तिधर्माची रग' या दोन लेखांत केला आहे.

सेतुमाधवराव पगडी यांचा 'श्रीसमर्थ व श्रीसमर्थ संप्रदाय' म्हणजे त्यांच्या ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा नमुना आहे याशिवाय वि. रा. करंदीकर यांचे 'साक्षेप समर्थांचा' व शं. दा. पेंडसे यांचे 'राष्ट्रगुरू समर्थ रामदास' ही पुस्तकेही अत्यंत उपयुक्त आहेत. या सर्व पूर्वसूरींचे ऋण मानून व समर्थांच्या ह्या भाष्यकारांना 'वाट पुसत'च पुढील ग्रंथाचा उपक्रम केलेला आहे. त्यांच्या उदंड परिश्रमांशिवाय या ग्रंथांतले एक अक्षरही लिहिता आले नसते. हीच त्यांच्या ऋणाची पावती.

## व्यक्तिदर्शन : ग्रंथाचे स्वरूप

या ग्रंथाचे स्वरूप स्पष्ट करणे जरूर आहे. यात रामदासांचे चरित्र, काव्याचे विवेचन व कार्याचे मूल्यमापनही असले, तरी रूढार्थाने ज्याला 'चरित्र' म्हणतात तसा हा ग्रंथ नाही. हे रामदासांचे 'व्यक्तिदर्शन' आहे आणि रामदास या व्यक्तीला प्राधान्य व केंद्रस्थान देऊन बालपणापासून समाधीपर्यंत, बीजातून वक्ष व्हावा, त्या 'बीजवक्षन्याया'ने त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास क्रमाक्रमाने कसा होत गेला, हे दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. ज्याला 'Character in Making' असे इंग्रजीत म्हणतात - तशा स्वरूपाचा हा ग्रंथ आहे. मराठीत असे ग्रंथ फारसे नाहीत असे वाटते. या प्रकारच्या 'व्यक्तिदर्शना'ला प्राधान्य देऊन लिहिलेल्या चरित्रग्रंथाच्या नमुन्यांसाठी 'जनी जाणता पाय त्याचे धरावे' या समर्थांच्या उक्ती प्रमाणे या कलेत 'जाणते' असलेल्या पाश्चात्य गुरूंचेच पाय धरण्याविना गत्यंतर नाही. कारण त्यांच्यामध्ये ही चरित्रकला दोनशे वर्षे अखंड वाढत आलेली आहे. बॉस्वेलचा 'जॉनसन', लॉकहार्टचा 'स्कॉट', फ्रूडचा 'कार्लाईल' हे एकोणिसाव्या शतकातील व लिटन स्ट्रॅचीची 'व्हिक्टोरिया', आन्द्रे मॉर्वाचे 'बायरन' 'व्हिक्टर ह्यूगो' स्टीफन झ्वाइगचे 'मेरी ॲन्टॉनिएट' 'क्वीन ऑफ स्कॉटस्' आणि एमिल लुडविगचा 'नेपोलियन' हे विसाव्या शतकातील ग्रंथ हे ह्या लालित्यपूर्ण, प्रत्यक्षदर्शी, नाट्यमय चरित्रलेखन कलेचे रमणीय आदर्श आहेत. म्हणून रामदासांबद्दल 'काय' लिहावे हे समजण्यासाठी पौर्वात्य गुरूंचे जसे मघाशी आभार मानले, त्याप्रमाणे रामदासांबद्दल 'कसे' लिहावे हे शिकण्यासाठी या पाश्चात्य गुरूंचेहि ऋण मानणे आवश्यक आहे.

## प्रतीत झालेले निष्कर्ष

समर्थांच्या अभ्यासाच्या अंती मला प्रतीत झालेले निष्कर्ष सूत्ररूपाने प्रारंभीच सांगणे युक्त होईल, कारण ती या ग्रंथाची फलश्रुती आहे, आणि त्याहीपेक्षा हे निष्कर्ष सुरुवातीलाच ध्यानात आल्यामुळे पुढील ग्रंथातील विवेचनाची दिशा लक्षात येणे सोपे जाईल. ते निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

(१) समर्थांनी वाग्दत्त वधूचा त्याग का केला, या प्रश्नाचे उत्तर - 'उत्तर नाही' असेच आहे. माणसांच्या आध्यात्मिक उत्क्रांतीच्या प्रवासात काही निर्णायक टप्पे असे असतात की, त्या प्रसंगी त्यांनी घेतलल्या निर्णयाचे समर्थन 'अंत:करण प्रवृत्ती' किंवा 'सद्सद्विवेक बुद्धी' यांना शरण गेल्याशिवाय मिळतच नाही. समर्थांचा हा निर्णय त्यांपैकीच आहे.

(२) समर्थ संप्रदाय हा केवळ ब्राह्मणांचाच होता हे विधान दिशाभूल करणारे आहे. काही मठपती ब्रह्मणेतर आहेत व काही मठपती स्त्रियाही आहेत.

(३) 'दासबोध' हा ब्राह्मणांसाठी लिहिलेला ब्राह्मणी ग्रंथ आहे हे विधानही सत्याला सोडून आहे. प्रपंचनिरूपण, भक्तिनिरूपण, भीमदशक, नि:स्पृहलक्षण, महंतलक्षण, बहुजिनसी, विवेक वैराग्य इत्यदि अनेक समास सर्वांसाठी व्यवहारवादाचे प्रतिपादन करणारे आहेत.

(४) रामदासी संप्रदाय समर्थांनी निर्माण केलेली 'तज्ज्ञसत्ता' होती. त्यात रामोपासनेप्रमाणे राजकारण, ग्रंथ रचना, लोकसंग्रह, चारित्र्य, अभ्यास, यांची आवश्यकता असल्यामुळे त्यांत सर्वांना प्रवेश मिळणे शक्य नव्हते. त्यांत ब्राह्मणांना प्राधान्य असले तरी त्यातल्या त्यात ते जाणते असल्यामुळेच होते. रामदासांना ब्राह्मणांविषयी पक्षपात असल्याच दिसत नाही. त्यांनी त्यांचे दोषही परखडपणाने सांगितले आहेत.

(५) रामदासी संप्रदायाच्या द्वारे समर्थांनी मराठी मनाची मशागत केली. त्या समाजशुद्धीकरणाचा उपयोग शिवछत्रपतींना झाला. शिवाजी महाराज 'मराठी राष्ट्राचे निर्माते' होते तर समर्थ 'मराठी राष्ट्रवादाचे निर्माते' होते. उभयतांच्या घनिष्ट संबंधांचे पुरावे समर्थ वाङ्मयात ठिकठिकाणी आलेले आहेत.

(६) समर्थांच्या निर्याणानंतर समर्थ संप्रदाय पुढे चालला नाही, कारण त्यांच्या शिष्यवर्गातून त्यांच्या प्रपंच विज्ञानाचे प्रतिपादन करणारा कोणी शिष्य निघाला नाही.

(७) तरी समर्थ संप्रदाय हिंदुत्वाचा, हिंदू संघटनेचा व हिंदुराष्ट्रवादाचा विचार सांगणाऱ्या व आचार करणाऱ्या टिळक, हेडगेवार, सावरकर यांच्या व त्यांच्या संघटनांच्या रूपाने अजूनही आहे आणि तो वाढतच आहे. राजवाडे यांनी ज्याला रामदासांचा 'जयिष्णु हिंदुधर्म' असे म्हटले आहे, त्या 'महाराष्ट्र धर्मा'चेच आजचा 'जयिष्णु हिंदु राष्ट्रवाद' हे परिवर्धित रूप आहे. हा जातीयवाद नव्हे. कारण 'हिंदुत्व' हेच सर्व समावेशक सहिष्णुत्वाचे दुसरे नाव आहे.

## श्रेयाचे मानकरी

या ग्रंथाचे पहिले श्रेय समर्थांचे समर्थ अभ्यासक श्रीपाद महादेव माटे यांना आहे. जवळ जवळ पन्नास वर्षांपूर्वी शाळेत असताना 'पारमार्थिकांनी रामदासाचा केलेला पराभव' हा माटे यांचा समर्थ समस्येचे स्वरूप सांगणारा निबंध मी वाचला व त्याचा माझ्या मनावर कधी न पुसला जाणारा ठसा उमटला. माटे यांनी रामदासांच्या अभ्यासाचे त्यावेळी जे बीजारोपण केले, त्या बीजाचाच प्रस्तुत ग्रंथ म्हणजे परिणत झालेला वृक्ष होय. योगायोग असा की या ग्रंथासाठी शोध करीत असताना पाच वर्षांपूर्वी दुर्मिळ असलेले माटे यांचे 'श्री रामदास स्वामींचे प्रपंच विज्ञान' हे पुस्तक, त्यांचे चिरंजीव श्री. म. श्री. माटे यांनी मला दिले. माटे यांचे ऋण त्यांच्या पुढील पिढीतही माझ्या बाबतीत चालू राहिले ते असे.

माटे हे पुणे शहराचे रहिवासी. या ग्रंथाला पुढची सारी मदत पुण्याच्याच लोकांनी केली आहे. हा केवळ योगायोग नव्हे. ज्ञानकोशकार केतकरांनी ज्ञानकोशाची मुहूर्तमेढ नागपूरला केली पण त्याचे कार्य व त्याची सांगता पुण्याला केली. त्याचे कारण त्यांनीच सांगितले आहे, की 'वाङ्मयासाठी जे प्रयत्न करतात त्यांचा पाठिराखेपणा पुणे शहर जेवढे करते तेवढे कोणतेच शहर करीत नाही.' केतकरांचा हा अनुभव अनेकांना आला, तसाच मलाही आला. ग्रंथलेखन करताना सर्वश्री मामा दाते, ग. वा. बेहेरे, रवी बेहेरे, प्रा. मनोहर कुलकर्णी, श्री. स.मा गर्गे, रवी घाटपांडे, म. श्री. दीक्षित या 'पुणेकर' मंडळींनीच मला सहाय्य केले. श्री. म. श्री. दीक्षित यांनी तर प्रस्तुत 'रामदास' ग्रंथाची कल्पना सुचविण्यापासून त्यासाठी प्रकाशक मिळवून देण्यापर्यंत सर्व प्रयत्न निरपेक्षबुद्धीने केले. त्यांच्यामुळेच 'चंद्रकला प्रकाशना'च्या सौ. शशिकला उपाध्ये यांचा व माझा परिचय झाला व त्यांनी हा ग्रंथ प्रकाशनासाठी स्वीकारला.

श्री. व सौ. उपाध्ये प्रकाशनाच्या व्यवसायात, आज बारा वर्षे आहेत. 'वादळवाटा', 'जे. कृष्णमूर्ती', 'जीवनभाष्ये', 'मतिमंदांची माता', 'पडद्यामागचा माणूस', 'नाच ग घुमा' ही त्यांनी प्रकाशित केलेली काही पुस्तके पाहिली तरी त्यांच्या प्रकाशनाचा उंच दर्जा ध्यानात आल्याशिवाय राहणार नाही. कवी हा कवी असावा व टीकाकारही असावा, त्याप्रमाणे सौ. उपाध्ये स्वत: प्रकाशक आहेत आणि लेखकही आहेत. समर्थभक्तीचा वारसा त्यांना घराण्यांतून मिळालेला आहे. समर्थांवरचा प्रस्तुत ग्रंथ त्यांच्या प्रकाशनाचे 'शंभरावे पुष्प' म्हणून त्या प्रकाशित करीत आहेत. यात त्या ग्रंथाइतकाच त्यांच्या समर्थभक्तीचाही गौरव आहे, असे मी समजतो.

समर्थांच्या चरणी वाहिलेले हे फूल रानफूल असेल, ते नीरस असेल, निर्गंधही असेल कदाचित्, पण ते भक्तीने वाहिलेले आहे. ते समर्थांच्या आदरास पात्र होईल यात मला शंका वाटत नाही. 'परी गीताईश्वर भोळा । ले व्यासोक्ति कुसुम माळा । परी माझिया दूर्वादळा । ना न म्हणेचि ॥' असे ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे, ते सर्वत्र, सर्वकाळी सत्यच आहे.

सर्वात शेवटी उल्लेख करावयाचा तो आमच्या चाळिसगाव कॉलेजच्या आणि चाळिसगावातील

ना.बं. वाचनालयाच्या अधिकारी वर्गाचा. त्यांच्या समृद्ध 'ग्रंथशाळे' तील ग्रंथांचा त्यांनी मला मुक्तहस्ते उपयोग करू दिला, म्हणूनच आज ह्या ग्रंथ समाप्तीच्या सोहळ्याचा आनंद मला अनुभविता येत आहे. चाळिसगाव हे माझे दुसरे घरच आहे, असे मी समजतो. घरच्या लोकांचे आभार मानण्याची पद्धत आपल्यांत आहे काय?

–श. श्री. पुराणिक

३६, न्यू आनंदनगर,
तळेगाव दाभाडे
४१०५०६

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १ | जन्म व बालपण | १३ |
| २ | साधना - एक करुणाष्टक | २८ |
| ३ | तीर्थयात्रा | ४५ |
| ४ | रामोपासना | ६७ |
| ५ | रामदासी तत्त्वज्ञान | ११२ |
| ६ | रामदासी संप्रदाय | १७२ |
| ७ | रामदास शिवाजी संबंध | २४१ |
| ८ | व्यक्तिदर्शन | २९३ |
| ९ | श्री समाधी | ३५८ |
| १० | रामदासांच्या पश्चात् | ४०६ |
| ११ | आजच्या संदर्भात रामदास | ४५१ |
| ● | संदर्भ सूची | ४८९ |
| ● | परिशिष्ट १ रामदास - काल सूची | ४९२ |
| ● | परिशिष्ट २ दासबोध - रचना | ४९३ |
| ● | परिशिष्ट ३ एकवचन व अनेकवचन | ४९४ |